# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

**ई-मेल :** mcaer@rediffmail.com **दूरध्वनी : (०२०) २५५२ ८२०८.**

**वेबसाईट :** www.mcaer.org


## नागरिकांची सनद

### १. प्रस्तावना :

महाराष्ट्रात एकूण ४ कृषी विद्यापीठे असून, चार कृषी विद्यापीठांमध्ये प्रभावी समन्वय व सुसूत्रता साधण्यासाठी महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३ कलम १२ नुसार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची स्थापना करण्यात आली. कृषी व पदुम विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद कार्यरत आहे. कृषी विद्यापीठांच्या कार्याचा आढावा घेणे, मूल्यमापन करणे आणि पर्यवेक्षण व मार्गदर्शन करण्याची जबाबदारी उक्त कायद्यान्वये कृषी परिषदेवर सोपविण्यात आलेली आहे. त्यासाठी ५ विभागांची रचना केली असून, त्यांच्यामार्फत कामाच्या विभागणीप्रमाणे कामे करण्यात येतात. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद नागरिकांची सनद प्रसिध्द करीत आहे. कृषी परिषद या कार्यालयाशी संबंधित असणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवा तत्परतेने, सौजन्यपूर्वक व सन्मानपूर्वक नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी कृषी परिषद बांधिल राहील.

शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र.१५५/७अे,दि.२०/१०/२०११ तसेच मकृवि२०१०/प्र.क्र.१५५ भाग १/७ अे,दि.२१/८/२०२० अन्वये शासनाने, कृषी विद्यापीठांतर्गत पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमामध्ये जागांचे आरक्षण, सामाजिक आरक्षणाच्या वाटपाची कार्यपध्दती व प्रवेश कार्यपध्दती निश्चित केली आहे. चारही कृषी विद्यापीठांतर्गत शासकीय महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क व इतर शुल्क ठरविण्यास कृषी परिषदेला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया कृषी परिषदेकडून राबविण्यात येते.

## २. कृषी परिषदेची रचना :

कृषी परिषदेचे मुख्यालय पुणे येथे असून, मा. ना. कृषीमंत्री, महाराष्ट्र राज्य हे परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतात. याशिवाय कृषी क्षेत्रातील नामवंत व्यक्तीची उपाध्यक्ष म्हणून नेमणूक केली जाते व त्यांना मंत्रीदर्जा असतो. मा. मुख्य सचिव, सचिव (कृषी), सचिव (नियोजन), सचिव (वित्त), कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, प्रत्येक विद्यापीठाच्या अधिक्षेत्रातून एक याप्रमाणे राज्य शासनाने नियुक्त करावयाचे संबंधित कार्यकारी परिषदेचे चार अशासकीय सदस्य, महामहिम कुलपती यांनी नियुक्त केलेला एक सदस्य, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे प्रतिनिधी, महाराष्ट्र शासन नियुक्त दोन नामवंत शास्त्रज्ञ हे कृषी परिषदेचे सदस्य असतात. कृषी परिषदेचे सदस्य सचिव तथा महासंचालक हे शासन नियुक्त अधिकारी असून कृषी परिषदेच्या कामकाजासाठी वेगवेगळया विषयाचे सल्लागार/संचालक दैनंदिन कामात त्यांना मदत करीत असतात. कृषी परिषदेच्या कामासाठी एकूण तीन संचालक, सहसंचालक (वित्त) आणि सहासंचालक (प्रशासन) कार्यरत आहेत.

## ३. कार्यपूर्तीचे वेळापत्रक :

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण क्र.३ च्या कलम ११ मध्ये नमूद केलेल्या न्यायप्रविष्ठ बाबी लोक आयुक्त किंवा उपलोकआयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, न्याययिकवत बाबी, केंद्र किंवा अन्य राज्य शासनाच्या संबंधातील प्रकरणे, विधी विभागाशी संबंधित बाबी, मंत्रीमंडळास सादर होणाऱ्या मुख्य धोरणात्मक बाबी इत्यादींना कार्यपूर्तीच्या वेळापत्रकातून सूट राहील.

# पदव्युत्तर आणि आचार्य पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेशविषयक वेळापत्रक

| अ.क्र. | बाब | पदव्युत्तर अभ्यासक्रम | आचार्य पदवी अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| १. | जाहिरात देणे | पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकानंतर २३ ते २४ दिवसानंतर ‘अ’ दर्जाच्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळावर जाहिरात, चालू शैक्षणिक वर्षाची प्रवेश माहिती पुस्तिका प्रकाशित करणे. | ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात ‘अ’ दर्जाच्या वर्तमानपत्रांमध्ये जाहिरात देऊन महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या संकेतस्थळावर जाहिरात, चालू शैक्षणिक वर्षाची प्रवेश माहिती पुस्तिका प्रकाशित करणे. |
| २. | ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची मुदत | ११ ते १२ दिवस | १२ ते १३ दिवस |
| ३. | अर्ज प्राप्त होण्याच्या शेवटच्या दिवसापासून पात्र उमेदवारांची प्राथमिक गुणवत्ता यादी कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याची मुदत. | ५ ते ६ दिवस | ७ ते ८ दिवस |
| ४. | प्राथमिक गुणवत्ता यादीबद्दल उमेदवारांच्या तक्रारी असल्यास त्यांनी ऑनलाईनद्वारे सादर केलेल्या तक्रारीचे निराकरण करून प्राथमिक गुणवत्ता यादी प्रकाशित केल्याच्या दिनांकानंतर अंतिम गुणवत्ता यादी कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याची मुदत. | ६ ते ७ दिवस | ८ ते ९ दिवस |

| अ.क्र. | बाब | पदव्युत्तर अभ्यासक्रम | आचार्य पदवी अभ्यासक्रम |
|---|---|---|---|
| **५.** | अंतिम गुणवत्ता यादी प्रकाशित झाल्यानंतर पहिल्या प्रवेश फेरीची वाटप यादी प्रसिध्द करण्याची मुदत. | १ ते २ दिवस | ४ ते ५ दिवस |
| **६.** | पहिल्या प्रवेश फेरीसाठी ३-४ दिवसांचा कालावधी देऊन प्रवेश फेरी संपल्यानंतर दुसऱ्या प्रवेश फेरीची वाटप यादी प्रसिध्द करण्याची मुदत. | १ ते २ दिवस | १ ते २ दिवस |
| **७.** | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी ३-४ दिवसांचा कालावधी देऊन प्रवेश फेरी संपल्यानंतर तिसऱ्या प्रवेश फेरीची वाटप यादी प्रसिध्द करण्याची मुदत. | १ ते २ दिवस | निरंक |
| **८.** | जागेवरील प्रवेश फेरी राबविणे. | तिसऱ्या प्रवेश फेरीसाठी ३-४ दिवसांचा कालावधी देऊन प्रवेश फेरी संपल्यानंतर ४ ते ५ दिवसांच्या कालावधीची प्रवेश फेरी. | दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी ३-४ दिवसांचा कालावधी देऊन प्रवेश फेरी संपल्यानंतर ४ ते ५ दिवसांच्या कालावधीची प्रवेश फेरी. |
| **९.** | वर्ग सुरू करणे. | जागेवरील प्रवेश फेरी संपल्यानंतर १ ते २ दिवसाच्या कालावधीत. | दुसरी प्रवेश फेरी संपल्यानंतर १ ते २ दिवसाच्या कालावधीत. |

- प्रत्यक्ष प्रवेशावेळी उमेदवारांच्या कृषी परिषद यांच्या स्तरावरील त्रुटी / तक्रारी प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून **७ दिवसांत** तक्रारीचा निपटारा करणे.
- **आंतरविद्यापीठीय विद्यार्थ्यांच्या बदल्या-** चारही कृषी विद्यापीठांचे कुलसचिव यांच्याबरोबर विद्यार्थ्यांच्या बदल्यांचे प्राप्त अर्जासह व विद्यापीठगणिक रिक्त असलेल्या जागांची माहिती प्राप्त करून तिसऱ्या व पाचव्या सत्राच्या नोंदणी दिवसाच्या ४ ते ५ दिवस अगोदर बैठक घेऊन कृषी विद्यापीठांना आदेश निर्गमित करण्यासाठी कळविणे.

**४. (अ) गाऱ्हाणी / तक्रारी यांचे निराकरण :**

कार्यपूर्तीस होणारा विलंब व अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी संचालक (शिक्षण) या अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पूर्तता कृषी परिषदेतर्फे करण्यात येईल.

**(ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा :**

या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा महासंचालक यांच्याकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल कृषी परिषदेच्या / शासनाच्या मान्येतेने करण्यात येतील.

**(क) जन सामान्यांकडून सूचना :**

ही नागरिकांची सनद सर्वसामान्य नागरिकांच्या माहितीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सूचनांचा गांभीर्यपूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. तसेच या विभागाच्या अधिनस्त येणाऱ्या सेवा उपभोगणाऱ्या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी ही सनद नेहमीच सहकार्य करीत राहील.

**५.नियम / परिपत्रक व नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी :**

या सनदेची अंमलबजावणी दि. १ एप्रिल, २०१२ पासून करण्यास कृषी परिषद कटिबध्द आहे. सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया/अभिप्राय त्यांच्या सूचनांचा यथोचित आदर करून आवश्यक बदल करण्यात येतील.

--------///--------